# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

- **जयस्तंभ वाहतूक सुधार प्रकल्पाचे काम जोमाने सुरु**

कोविड-१९ मुळे एकूणच सर्वत्र विपरीत परिणाम झाला असताना, महा मेट्रो तर्फे जयस्तंभ वाहतूक सुधार प्रकल्पाचे काम देखील वेगाने सुरु आहे. सेंट्रल रोड फंड (सीआरएफ) अंतर्गत या प्रकल्पाचे काम सुरु असून या करिता मुख्य रेल्वे स्थानकासमोरील रस्त्यावरील दुकानांचे पुनर्वसन नागपूर महानगर पालिकेतर्फे होणार आहे.

एकूण २३४ कोटी खर्च असलेल्या या प्रकल्पाचे ४ महत्वाचे भाग आहेत:

१. वाय आकाराचा उड्डाण पूल

२. लोखंडी पुलाखालून रेल-अंडर-ब्रिज (आरयुबी)

३. सिमेंट काँक्रीट रोड

४. बहू मजली वाहन तळ

**वाय आकाराचा उड्डाण पूल :** हा उड्डाण पूल राम झुला रेल ओव्हर ब्रिज (आरओबी) येथून सुरु होत किंग्सवे वरील श्री मोहिनी चौकापर्यंत असून येथून या पुलाचे दोन भाग होणार आहेत. या पैकी एक भाग - आरबीआय चौकाकडे तर दुसरा भाग एलआयसी चौकाच्या दिशेने असेल. या उड्डाण पुलाची एकूण लांबी ८५० मिटर आहे. राम झुला आणि श्री मोहिनी चौकादरम्यान हा पूल दोन पदरी असेल.

दुसरीकडे श्री मोहिनी चौक ते आरबीआय चौक आणि श्री मोहिनी चौक ते एलआयसी चौकादरम्यान हा पूल एक-पदरी असेल. उड्डाण पुलाच्या पियर कॅपचे तसेच स्टील गर्डरचे काम सध्या सुरु आहे.

**लोखंडी पुलाजवळ रेल-अंडर-ब्रिज (आरयुबी) :** हा प्रस्तावित आरयुबी ४७ मीटर लांब आणि १२ मीटर रुंद असून याची उंची ४.५ मीटर आहे. या अंतर्गत दोन समांतर बोगदे दोन बॉक्सच्या माध्यमाने तयार केले जातील. या पैकी एका बोगद्यात १.५ मीटर रुंद पादचारी मार्ग असेल. या दोन बोगद्यांकरता बॉक्स तयार करण्याचे काम सुरु असून मध्य रेल्वेकडून परवानगी मिळाल्यावर ते बॉक्स रेल्वे मार्गिकेच्या खाली स्थापित केले जातील.

**सिमेंट कॉँक्रीट रोड आणि मानस चौक वाहतूक सुधार प्रकल्प :** या प्रकल्पाअंतर्गत सहा पदरी ९५० मीटर लांब सिमेंट कॉँक्रीटचा मार्ग मानस चौक ते जयस्तंभ चौक दरम्यान बांधला जाईल. या करता त्या मार्गावरील दुकानदारांचे पुनर्वसन नागपूर महानगर पालिकेच्या माध्यमातून होणार असून या कामाकरता महा मेट्रोने ७० गाळे देखील बांधले आहेत. मानस चौकाचे सुशोभीकरण देखील याच अंतर्गत होणार आहे.

**बहू मजली वाहन तळ (पार्किंग प्लाझा) :** या प्रकल्पाचा आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे बहू-मजली वाहन तळ (पार्किंग प्लाझा). नागपूर रेल्वे स्थानकाजवळ हा प्रकल्प होऊ घातला आहे. या वाहन तळांतर्गत ५०० कार,५५० दुचाकी आणि ६०० सायकलच्या पार्किंगची सोय असेल. नागपूर रल्वे स्थानक आणि गणेश टेकडीला या पार्किंग प्लाझा येथून फूट ओव्हर ब्रिज (एफओबी) च्या माध्यमाने पायी जाण्याची सोय असेल.